# Current Global Reviewer


Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 | Impact Factor - 7.139 | Indexed (SJIF)

March 2020 Special Issues- 25 Vol. 3


# The Current Issues in Social Sciences in India (CISSI-2020)


**Chief Editor**
Mr. Arun B. Godam

**Guest Chief Editor**
Prof. Dr. B. D. Kokate (I/C Principal)

Dr. S. S. Undare (Vice Principal)
Dr. G. A. Mohite (Vice Principal)

**Editor**
Dr. R. K. Kale

**Co-Editors**
Dr. S. N. Akulwar
Dr. B. D. Jadhavar
Dr. S. E. Ghumatkar



Balbhim Arts, Science & Commerce College, Beed

44. राजर्षी शाहू व सामाजिक कार्ये 140
प्रा. डॉ. रोटे एम.व्ही.

45. भारतीय प्रशासना पुढील आव्हाने व सुधारणा : चिकित्सक अध्ययन 142
प्रा. सचिन टी. धुर्वे

46. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्वतंत्र्य मजूर पक्ष आणि भारतीय कामगार चळवळ 145
प्रा. राहुल चोखाजी साळवे

47. ‘‘कलम 370(35A) उदय–अस्त’ 148
श्री. साळवे सतीश शंकरराव

48. महिला सशक्तिकरण और मानवाधिका 151
डॉ.सानप शाम बबनराव

49. लिंगभाव आणि उच्च शिक्षणातील आव्हाने – एक समाजशास्त्रीय अध्ययन 154
प्रा. संदीप रायबोले

50. Politics of Minority, Politices of Majority 158
डॉ.संतोष शिवकुमार खत्री, **श्री.संदिप जगन्नाथ वारूळे**

51. बँकिंग क्षेत्रासमोरील आव्हान : गैर निष्पादित संपत्ती (NPA) 160
प्रा. संदीप चव्हाण

52. दहशतवाद: एक जागतिक आव्हान 164
प्रा.संजय अंकुशराव जगताप

53. जातीवाद 167
संजय सदाशिव जाधव

54. नक्सलवाद : कारण, परिणाम एवं उपाचार 170
प्रा. डॉ. संतोष शिवकुमार खत्री

55. भारतातील सामाजिक विज्ञानातील सध्याचे प्रश्न "भारतीय राजकारणातील कलक ३७० व ३५ अ मधील सुधारणा" 174
संतोष शंकर चव्हाण, डॉ. हनुमंत भूमकर

56. भारतीय संविधान : मूलभूत कर्तव्याची प्रासंगिकता 176
डॉ.सिध्देश्वर सटाले

57. भारतीय सामाजिक चळवळीमध्ये महिलांचे योगदान 178
प्रा.डॉ.एच.टी.सातपुते

58. कॅशलेस अर्थव्यवस्था काळाची गरज 181
डॉ. सावळे एकनाथ ग्यानोबा

# भारतीय संविधान : मूलभूत कर्तव्याची प्रासंगिकता

**डॉ.सिध्देश्वर सटाले**

राज्यशास्त्र विभागप्रमुख, र.भ.अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य, महाविद्यालय, गेवराई

---

**प्रस्तावना :-**

भारतीय संविधानात्मक मूल्यांची समाजात जी पेरणी झाली त्याचे श्रेय भारतातील सुधारकांना व परिवर्तनवादी चळवळीना द्यावे लागेल. न्याय, स्वातंत्र्य, समता, आणि बंधुता ही मूल्ये स्वातंत्र्य चळवळीतून पुढे आलेली आहेत. स्वातंत्र्यानंतर संविधानाच्या भाग तीन मध्ये भारतीय नागरिकांना बहाल करण्यात आलेल्या मूलभूत हक्कांचा समावेश आहे. संविधानाच्या भाग चार मध्ये भविष्यात शासनाने काय काय करावे याचे मार्गदर्शन केले आहे. या मार्गदर्शक तत्वांमध्ये प्रामुख्याने भारतीय लोकांचे कल्याण, देशातील महत्वपूर्ण धरकांचे सरक्षण व सामाजिक सुधारणा या गोष्टींचा समावेश आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी असे स्पष्ट केले होते की भारतीय संविधानातील भाग तीन मधील मूलभूत हक्क हे साधन आहे, तर भाग चार मधील मार्गदर्शक तत्वे हे आमचे साध्य आहे. यावरुन मार्गदर्शक तत्वांचे महत्व अधोरेखित होते.

भारतीय संविधानांच्या मार्गदर्शक तत्वांतील तरतुदीची जाणकारांना कल्पना आहे तसेच या संदर्भातील उदिष्टे भारताने किती साध्य केली याचीही कल्पना आहेच. शासनाने भारतीय समाजासाठी काय करावे हे जसे महत्वाचे आहे. तसेच भारतीय नागरिक म्हणून नागरिकांच्या जबाबदाऱ्या व मूलभूत कर्तव्ये काय आहेत हे नागरिकांना माहीत आहेतका किंवा या संदर्भात लोकशिक्षण करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला का ? या प्रश्नाचे उत्तरही दुदैवाने नकारात्मक आहे मूलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्वे आणि नागरिकांची जबाबदारी हा त्रिकोण जाणीवपूर्वक सांधला गेल्याशिवाय संविधानास अपेक्षित असणारा समाज व राष्ट्र निर्माण होणार नाही. आपल्या घटनेच्या प्रास्ताविकाच्या मागील सामुग्रीवर यथोचित टिपणी करणाऱ्या लोकशाही शासनविषयीचे आधुनिक अभ्यासकांपैकी प्रा.अॅनर्स्ट बार्कर म्हणतात की, " स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यासाठी कर्तव्यपूर्तीची क्षमता अणि तळमळ असायला हवी आणि सर्वांना व्यक्तिमत्वाचा आदर असायला हवा. राष्ट्रीय एकजिन्सीपणाच्या समस्या अजून ही दबाव टाकत असतील तर सौहार्दाची समान भावना नसेल. मूलतः एक व्यक्तीपणामुळे समुदायाचा काही भाग जर दुसऱ्यांच्या कमी शिक्षणामुळे किंवा खालच्या कुळामधे किंव इतर कोणत्याही आधारावर हुजरेगिरी करीत असेल तर सामान्य व्यक्तीच्या स्वातंत्र्याची संकल्पना ही तेवढीच काल्पनिक असते.

**संशोधनाचा उद्देश :-**

१) कर्तव्याची संकल्पना स्पष्ट करणे.
२) मूलभूत कर्तव्याचा अभ्यास करणे
३) आजच्या काळात मुलभूत कर्तव्याची प्रासंगिक अभ्यास करणे.

**भारतीय संविधान आणि कर्तव्ये :-**

व्यक्तीला जसे हक्क असतात तशीच कर्तव्येही पार पाडावी लागतात. हक्क व कर्तव्य सारखीच महत्वाची आहेत. जरी नागरिकांचे हक्क आणि कर्तव्ये यांचा परस्पर संबध असला व ते परस्परांपासून वेगळे करता येत नसले तरी मूळ राज्यघटनेमध्ये फक्त मूलभूत हक्क मांडले होते व मूलभूत कर्तव्ये मांडली नव्हती. म्हणजेच नागरिकांच्या मूलभूत कर्तव्यांचा राज्यघटनेत समावेश करावा. अशी कदाचित घटनाकारांना आवश्यकता वाटली नव्हती परंतु राज्य धोरणांची मार्गदर्शन तत्वे या स्वरुपात राज्यांची कर्तव्ये मात्र घटनेत समाविष्ठ केली गेली होती. पुढे सन १९७६ मध्ये नागरिकांच्या मूलभूत कर्तव्यांचा घटनेत समावेश करण्यात आला. सन २००२ मध्ये आणखी एका मूलभूत कर्तव्याचा समावेश करण्यात आला.

भारतीय राज्यघटनेतील मूलभूत कर्तव्यासाठी पूर्वीच्या सोव्हिएन रशियाच्या राज्यघटनेपासून प्रेरणा घेतली आहे. विशेष म्हणजे, अमेरिका, कॅनडा, फ्रान्स, जर्मनी, ऑस्टोलिया इत्यादी कोणत्याही प्रमुख लोकशाही देशांच्या राज्यघटनेत नागरिकांच्या कर्तव्यांची सूची स्पष्टपणे मांडलेली नाही. आणि बागीच्या काळात ( १९७५-७७) मूलभूत कर्तव्यांची आवश्यकता व गरज असल्यामुळे त्यांच्या विषयी शिफारशी करण्यासाठी कॅग्रेस पक्षाने १९७६ मध्ये सरदार स्वर्णसिंग समितीची स्थापना केली. राज्यघटनेमध्ये मूलभूत कर्तव्याचा एक नवा भाग समाविष्ट करावा, अशी समितीने शिफारस केली. सन १९७६ मध्ये ४२ वी घटनादुरुस्ती अधिनियम संमत केला. या दुरुस्ती अन्वये घटनेत भाग ४ ए नव्याने समाविष्ठ करण्यात आला. या भागात फक्त एकच कलम ( १५ ए) आहे. या कलमात प्रथमच नागरिकांची दहा मूलभूत कर्तव्ये मांडली आहेत.

**मूलभूत कर्तव्यांची सूची :-**

१) संविधानाचे पालन करने, संविधानातील आदर्श, संस्था राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे.
२) स्वातंत्र्य लढयास प्रेरक ठरलेल्या उदात्त आदर्शाची जोपासना करुन त्यांचे अनुकरण करणे.
३) देशांचे सार्वभौमत्व एकता व एकात्मता उन्नत राखणे व त्यांचे संरक्षण करणे.
४) देशांचे संरक्षण व देशसेवा करण्यास तयार राहणे.
५) धर्म, भाषा प्रदेश किंवा वर्गीय भेद विसरुन भारताच्या जनतेमध्ये सामजरचव बंधुभाव वाढीस लावणे, स्त्रियांच्या प्रतिष्ठेला बाधा आणण्याऱ्या प्रथा सोडून देणे.
६) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारसाचे मोल जाणीवेचे जतन करणे.

७) जंगले, सरोवरे, नद्या, वन्य जीवसृष्टी यासह नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करणे व त्यात सुधारणा करणे प्राणीमात्रांबद्दल दयाबुध्दी बाळगणे.

८) विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन, मानवतावाद आणि शोधक बुध्दी व सुधारकवृत्ती यांचा विकास करणे.

९) सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे व हिसांचारापासून दूर राहणे.

१०) व्यक्तिगत व सामुदायिक अशा सर्व कार्यक्षेत्रात यश मिळवण्यासाठी झटणे.

११) ६ ते १४ वयोगटातील मुलामुलींना त्यांच्या पालकांनी शिक्षणाची संधी द्यावी.

**कर्तव्ये : अर्थ आणि स्वरुप :-**

कर्तव्ये म्हणजे सर्वसाधारणपणे समाजहित समाजकल्याणाचे उदिष्ट ग्रहीत धरुन काही कार्ये व्यक्तीला सक्तीने पार पाडावी लागतात. सक्तीने पार पाडावयाची ही कार्ये म्हणजे कर्तव्य होय. कर्तव्ये पार पाडण्याची ही कार्ये म्हणजे कर्तव्य होय. कर्तव्ये पार पाडण्याची सक्ती ही नितिमत्ता आणि कायद्याच्या माध्यमातून केले जाते. व्यक्तीवर विशिष्ट कार्ये करण्यासाठी कायदा आणि नितिमतेव्दारे बंधने टाकली जातात. ही बंधने म्हणजेच कर्तव्ये होय कर्तव्य पालनातून व्यक्ती आणि समाज असा दोघांचा ही विकास घडून येतो. जसे नियमित कर भरणे हे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे. कायद्याने हे कार्य करण्यासाठी व्यक्तीवर बंधन टाकले आहे. कर भरणे हे समाज विकासासाठी आवश्यक आहे. व्यक्तीने असाकर भरला नाही तर राज्याला लोककल्याणकारी योजना राबविता येणार नाहीत. अशाप्रकारे कर भरण्याच्या कर्तव्य पालनात समाजाचे व्यापक हित सामावलेले आहे.

**मूलभूत कर्तव्यांची वैशिष्ट्ये :-**

१) काही नैतिक कर्तव्ये आहेत तर काही नागरी कर्तव्ये आहेत. उदाहरणार्थ, स्वातंत्र्यलढ्यातून निर्माण झालेल्या उदात्त आदर्शाचा अभिमान बाळगणे हे नैतिक कर्तव्य आहे. तर घटनेचा राष्ट्रध्वजाचा व राष्ट्रगीताचा आदर करणे हे नागरी कर्तव्य आहे.

२) काही मूलभूत हक्क नागरिक व परदेशी व्यक्तीसाठी आहेत मात्र मूलभूत कर्तव्ये फक्त नागरिकांसाठी असुन परदेशी व्यक्तीना लागू होत नाहीत.

**मूलभूत कर्तव्यांवर टीका :-**

१) मूलभूत कर्तव्यांची यादी परिपूर्ण नाही, कारण यामध्ये मतदान करणे, कर भरणे, कुटुंब नियोजन करणे इत्यादी महत्वाच्या कर्तव्याचा उल्लेख नाही वस्तुताः कर देणे मूलभूत कर्तव्याची सपर्णसिंग समितीने केले होते.

**मूलभूत कर्तव्यांचे महत्व :-**

१) मूलभूत हक्कांचा उपभोग येत असताना आपल्या देशाप्रती समाजाप्रती व नागरिकांपरी आपली काही कर्तव्ये असताना याची जाणीव होते.

२) मूलभूत कर्तव्यामुळे भारतीय नागरिकांमध्ये एका प्रकारे शिस्त लागते.

३) मूलभूत कर्तव्यांमुळे व्यक्तीमध्ये राष्ट्रप्रेम निर्माण होऊन राष्ट्रविरोधी व समाजविरोधी कृत्यांबद्दल व्यक्ती मध्ये जागृती निर्माण होते. उदा- राष्ट्रध्वज जाळणे, सार्वजनिक संपत्तीचे नुकसान करणे इत्यादी.

**मूलभूत कर्तव्यांची प्रासंगिकता :-**

मूलभूत कर्तव्यांच्या संविधानामध्ये सामिल होवून तीन शतके होवून गेली तरी पण नागरिकामध्ये मूलभूत कर्तव्याप्रती पाहिजे तितकी जागरुकता नाही.

२०१६ मध्ये एका जनहित याचिका अनुसार एक सत्य समोर आले की, सर्वोच्य न्यायालयाची वकिल व न्यायाधीशाला संसदेच्या सदाचारसहित देशातील ९९.९ टक्के नागरिकाला संविधानातील कलम ५१. ए मध्ये वर्णित कर्तव्य पूर्ण करु शकत नाही.

**समारोप :-**

लोकशाही मध्ये नागरिकांनी आपल्या अधिकारांविषयी जागरुकअसले पाहिजे. अन्यथा अन्याय, शोषण व विषमता यांचे निवारण होणार नाही. लोकशाहीमध्ये नागरिकांनी आपली कर्तव्ये ही पार पाडली पाहिजेत. व्यक्ती, समाज व राष्ट्र यांच्या विकासासाठी तसेच देशात एकात्मता मजबूत करण्यासाठी नागरिकांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करुन देणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीने आपले कर्तव्य पार पाडून सामाजिक आर्थिक आणि राजकीय लोकशाहीची संकल्पना समानता व बहुतेशी जोडून महत्मा गांधीच्या स्वप्नांतील भारत प्रस्थापित करता येईल.

**संदर्भ ग्रंथ :-**


१) कसबे रावसाहेब - डॉ. बाबासाहेब आणि भारतीय राज्यघटना, सुगावा प्रकाशन पुणे व्दितीय आवृत्ती २००१.

२) दुर्गादास बसु - भारत का संविधान एक परिचय वाघावा प्रकाशन नागपूर नौवा संस्करण २०११.

३) क्रॉनिकल - भारतीय शासन एव राज्यव्यवस्था मे २०१९

४) एम लक्ष्मीकांत इंडियन पॉलिटी संस्करण के सागर पब्लिकेशन्स २०१७